भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क. ४३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२१/०७/२०१६.

**१) शिविगाळ करुन डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १९/०७/०१६ रोजी २१.०० वा. दरम्यान फिर्यादी सौ. साधना रामदास ऊईके वय ३८ वर्ष, रा. सोनेगाव येथील आरोपी हा पुतण्या लागतो ते एकमेकांच्या घराशेजारी वेगवेगळया घरी राहतात. आरोपीने फिर्यादीच्या पतीस ''जमिनीचा हिस्सा मला का देत नाही '' असे म्हणुन भांडण केले ढकलढुकल व शिवीगाळ केली. तिच्या पतीला खाली जमीनीवर पाडल्या नंतर फिर्यादी ही भांडण सोडविण्यास गेली असता तिला सुध्दा ढकलढुकल केले व हातातील कडयाने डोक्यावर मारुन आपखुशीने दुखापत केली असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गभणे पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**२) एसटीच्या धडकेने इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक २०/०७/२०१६ रोजी चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रल्हाद श्रीराम ऊके वय ६० वर्ष, रा. एकोडी टोली यांचा मुलगा मृतक शैलेश प्रल्हाद ऊके वय ३५ वर्ष, रा. एकोडी टोली हा आपल्या घरा समोरील रोडचे बाजुला ऊभा असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील एसटी बस ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मृतकास धडक दिल्याने जखमी केले. व त्याच्या मरणास कारणीभुत झाला असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**३) संगनमत करुन डोक्यावर काठीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक १९/०७/२०१६ रोजी २०.०० वा. दर. फिर्यादी सौ. सुशिला गुलाब धारगावे वय ४० वर्ष, रा. बेटाळा व तिचे पती घरच्या लोकांना शेतीच्या बांधीतील पाणी सोडण्याचे कारणा वरुन आरोपी क्र. १ बिसन दौलत धारगावे वय ५५ वर्ष, क्र.२ सौ. पार्वता बिसन धारगावे वय ५० वर्ष, क्र. ३ सचिन बिसन धारगावे वय ३० वर्ष, क्र.४ संघरत्न बिसन धारगावे वय २५ वर्ष, हे चारही रा. बेटाळा यांनी भांडण व  शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपी क्र. ३ ने फिर्यादीच्या डोक्यावर काठीने मारुन जखमी केले असे फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक २१/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०२ केसस, तिन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व इतर वाहनांवरती १७३ केसेस करण्यात आलेल्या आहेत

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

21/7/16

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.